सोलार पॉवर प्रोजेक्ट, साक्री या प्रकल्पासाठी के.एफ.डब्ल्यु. जर्मन बँकेकडून महानिर्मिती कंपनी मर्यादित यांना प्राप्त झालेल्या कर्जाच्या रकमेच्या (१९.८६९२ कोटी) पुस्तकी समायोजनाबाबत वित्तीय वर्ष २०२४-२५ (लेखाशिर्ष ६८०१०६६५)

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग
शासन निर्णय क्र.पुरमा-२०२४/प्र.क्र.५७/ऊर्जा-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २६ मार्च, २०२५

संदर्भ:- १)उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.पुरमा-२०२४/प्र.क्र.५७/ऊर्जा-३, दि.२५ सप्टेंबर, २०२३.
२) महालेखापाल कार्यालय, मुंबई यांचे पत्र क्र.D.O.No.AC.II/CAORB/CH-१/२०२३-२४/३२०, दि.०९ सप्टेंबर, २०२३.
३) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२४/प्र.क्र.८०/अर्थ-३, दि.१७ मार्च, २०२५.

<u>प्रस्तावना</u> :-

Solar Maharashtra PV Power Plant, Sakri (Shivajinagar) प्रकल्प के.एफ.डब्ल्यु. जर्मन बँकेच्या सहकार्याने उभारण्यात येत आहे. सदर प्रकल्पासाठी के. एफ. डब्ल्यु. जर्मन बँकेकडून अॅडवाईज क्र.९४,दि.१०/०४/२०२४, क्र.३१४,दि.०३/०६/२०२४ व क्र.९२७ दि.११/०९/२०२४ अन्वये रु.१९.९६८२कोटी (रु.एकोणीस कोटी शहान्नव लाख ब्याऐंशी हजार फक्त) परस्पर महानिर्मिती कंपनीला अदा करण्यात आली आहे.

२. सदर रक्कम महालेखापाल कार्यालयाने ८६५८-११० CAORB suspense या निलंबन लेखाशिर्षाखाली दर्शविले आहेत. या रकमा दीर्घ कालावधीसाठी निलंबन खात्यामध्ये वर्ग करुन ठेवणे योग्य नसल्यामुळे, सदर रक्कम योग्य त्या लेखाशीर्षाखाली वर्ग करुन, पुस्तकी समायोजन करण्याबाबत महालेखापाल कार्यालयाने सूचित केले आहे. मागणी क्रमांक के-११, ६८०१ वीज प्रकल्पासाठी कर्जे, १९० सार्वजनिक क्षेत्र व इतर उपक्रमांना कर्ज, (००)(००)(०४) सौर ऊर्जा प्रकल्पासाठी के.एफ.डब्ल्यु.जर्मन बँकेकडुन महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीला कर्जे (कार्यक्रम)(६८०१०६६५), ५५ कर्जे व आगाऊ रकमा या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्याकरिता व तो सन २०२४-२५ या वित्तीय वर्षासाठी मुळ+पुरवणी रू.४३.३११९ कोटी सुधारित तरतूदीपैकी वित्त विभागाच्या मान्यतेने रु.२३.३४३७ कोटी निधी पुस्तकी समायोजनाने वितरित करण्यात आले असून, आता लेखाशिर्ष ६८०१०६६५ खाली महालेखापाल यांनी सूचीत केल्यानुसार व मार्च,२०२५ च्या अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे तरतूद करण्यात आलेली उर्वरित रु.१९.९६८२ कोटी इतकी रक्कम योग्य त्या लेखाशिर्षाखाली दर्शविण्यासाठी पुस्तकी समायोजन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सोलार पॉवर प्रोजेक्ट, साक्री प्रकल्प, के. एफ. डब्ल्यु. जर्मन बँकेकडून रक्कम **रु.१९.९६८२ कोटी (रु.एकोणीस कोटी शहान्नव लाख ब्याऐंशी हजार फक्त)** महानिर्मिती कंपनीस थेट प्राप्त झाली आहे. तरी सदर रक्कम पुस्तकी समयोजनाने वितरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाची रक्कम ज्या कारणासाठी मंजूर करण्यात आलेली आहे, त्याच कारणासाठी उपयोगात आणली जाईल, याची खातरजमा करावी.

३. वरील बाबींचा खर्च "क्रमांक के-११, ६८०१ वीज प्रकल्पासाठी कर्जे, १९० सार्वजनिक क्षेत्र व इतर उपक्रमांना कर्ज, (००)(००)(०४) सौर ऊर्जा प्रकल्पासाठी के.एफ.डब्ल्यु. जर्मन बँकेकडून महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीला कर्जे (कार्यक्रम) (६८०१०६६५), ५५ कर्जे व आगाऊ रकमा" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा व तो सन २०२४-२५ या वित्तीय वर्षासाठी मंजूर असलेल्या तरतूदीमधून समायोजित करण्यात यावा.

४. सदर रकमेचे पुस्तकी समायोजन महालेखापाल, मुंबई यांचे अखत्यारित व अधिकारात करण्यात येत असल्याने या रकमेचे देयक तयार करण्यात येऊ नये.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१ यांनी त्यांच्या अखत्यारित व अधिकारात **रु.१९.९६८२ कोटी (रु.एकोणीस कोटी शहान्नव लाख ब्याऐंशी हजार फक्त)** इतक्या रक्कमचे पुस्तकी समायोजन करुन शासनास तसे कळवावे.

५. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.११२/२०२५/व्यय-१६, दिनांक २१-०३-२०२५ मधील मंजूरीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०२५०३२६१७१६२०१४१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NARAYAN SHRIKRISHNA KARAD

Digitally signed by NARAYAN SHRIKRISHNA KARAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY LABOUR AND MINING DEPARTMENT, 2.5.4.20=fc35aa8ffade5bb6105200693c60a32b755f7e67f72965b8dd57adaa570981f1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AE7FAEABAF4571C2748E4DD5FFD2CD108DE0E130859970F4D7D0EE40046B3E9E, cn=NARAYAN SHRIKRISHNA KARAD
Date: 2025.03.26 17:17:30 +05'30'

(ना. श्री. कराड)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव,राजभवन,मलबार हिल,मुंबई.
२) मा. अध्यक्ष/उपाध्यक्ष विधानसभा,सभापती/उपसभापती विधानपरिषद,यांचे सचिव.
३) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव मंत्रालय, मुंबई-३२.
४) मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) ,यांचे प्रधान सचिव मंत्रालय, मुंबई-३२.
५) मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन), यांचे प्रधान सचिव मंत्रालय, मुंबई-३२.
६) मा. मंत्री अपारंपारिक ऊर्जा,यांचे खाजगी सचिव मंत्रालय,मुंबई-३२.
७) मा. राज्यमंत्री ऊर्जा, यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई-३२.
८) सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई-३२.
९) मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई-३२.
१०) सर्व विधानसभा/विधानसभा सदस्य.
११) मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.

१२) अपर मुख्य सचिव (वित्त) मंत्रालय, मुंबई-३२.
१३) अपर मुख्य सचिव (नियोजन) मंत्रालय, मुंबई-३२.
१४) अपर मुख्य सचिव (ऊर्जा) उद्योग,ऊर्जा,कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१५) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१६) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सुत्रधारी कंपनी, फोर्ट, मुंबई.
१७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई-४०००२०.
१८) महालेखापाल (लेखा व परिक्षा),महाराष्ट्र-१, मुंबई-४०००२०.
१९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
२०) अधिदान व लेखा अधिकारी (अराप/रालेवि-१), मुंबई.
२१) अधिदान व लेखा अधिकारी,अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
२२) कक्ष अधिकारी (रोख), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई -४०००३२.
२३) कक्ष अधिकारी (प्रशा-५), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई -४०००३२.
२४) वित्त विभाग, (अर्थसंकल्प-१३ / साधनसंपत्ती / साऊ / व्यय-१६) मंत्रालय, मुंबई-३२.
२५) निवड नस्ती (ऊर्जा-३) उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.